जिल्हाधिकारी चंद्रपूर यांचे कार्यालय

क्र.मशा/कार्या-२/आस्था.लेखा.टे.४/२०१३/९८२

दिनांक :- १४ नोव्हेंबर, २०१३

**अत्यंत महत्वाचे**

**प रि प त्र क**

माझे असे निदर्शनास आले आहे की, सेवा निवृत होणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांचे सेवा निवृत्ती नंतर चे लाभ वेळेत मिळत नसल्याने, सेवा निवृत्त अधिकारी / कर्मचारी मा.लोक आयुक्त, यांचेकडे तक्रार करतात आणि कार्यालयाचा याकामी नाहक वेळ जातो.

तरी आपले कार्यालयातील सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांचे **निवृत्ती वेतन प्रकरण** (Pension) विहीत कालावधीत प्राप्त करुन लेखाधिकारी, वेतन पडताळणी पथक नागपूर तसेच महालेखाकार, द्वितीय महाराष्ट्र नागपूर यांना सादर करण्यात यावे. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रमांक भनिनि/१११३/२१४/(प्र.क्र.७५/ १३)/१३-अ, दिनांक २९/०६/२०१३ अन्वये **भविष्य निर्वाह निधीच्या वर्गणीदारांना अंतिम प्रदानकरीता** विहित नमुन्यातील अर्ज **नियत सेवानिवृत्तीच्या दिनांकाच्या एक वर्ष आधी** महालेखापाल, नागपूर यांचे कार्यालयात सादर करण्याचे अनुषंगाने संबंधिताकडून विहीत मुदतीतच अर्ज / प्रस्ताव प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. तसेच न्यायालयीन किंवा विभागीय चौकशीचे प्रकरणात ६ महिन्याचे कालावधी करीता महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) **नियम १९८२ चे नियम १३० अन्वये तात्पुरती सेवानिवृत्ती** वेतन प्रदान करावे. पुढे आवश्यकता भासल्यास महालेखाकार, नागपूर यांना पुढील तात्पुरत्या निवृत्ती वेतनाचे प्रस्ताव सादर करावे. शक्यतो सेवानिवृत्ती नंतर लगतच्या आठवडयात **गट विमा योजनेची** रक्कम तसेच अर्जीत **रजा रोखीकरणाची** रक्कम अदा करण्याबाबतची कार्यवाही करावी. तरी शासनाने ठरवून दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात यावी. तसेच कोणीही सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी सेवानिवृत्तीनंतर मिळणाऱ्या लाभाकरीता मा.लोक आयुक्त, यांचेकडे जाणार नाही याची खबरदारी घ्यावी.प्रकरणात विलंब झाल्यास जबाबदारी निश्चित करण्यात येईल. तसेच वर्ष २०१४ व २०१५ मध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची यांदी विहित प्रपत्रात या कार्यालयास ३० नोव्हेंबर, २०१३ पर्यंत न चुकता सादर करावी.

(मुळ प्रत मा. जिल्हाधिकारी द्वारा अनुमोदित)

स्वा/-

**जिल्हाधिकारी, चंद्रपूर**

९

प्रतिलिपी :- माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.

१.उपविभागीय अधिकारी, . . . . . . . . . . . . . . . (सर्व)

२. प्रभारी अधिकारी . . . . . . . . . . . . . . . . . शाखा जि.का.चंद्रपूर (सर्व)

३. तहसिलदार . . . . . . . . . . . . . . . . . (सर्व)

४. जिल्हा सुचना व विज्ञान माहिती अधिकारी, (NIC) चंद्रपूर यांना माहिती तथा तथा संबंधित कर्मचाऱ्याची माहिती संकेतस्थळावर अद्यावत करण्यास अग्रेषित.

१९/११/१३

जिल्हाधिकारी, चंद्रपूर करीता